**"जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रति वाढो,**
**भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे."**

यालाच मिळता जुळता पुणे पोलीसांचा आदर्श आहे. **'सद्‌रक्षणाय खलनिग्रहणाय' हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य आहे.** हे ब्रीदवाक्य साकारण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सतत काम करतात. म्हणूनच आज देशभरामध्ये महाराष्ट्र पोलीस प्रत्येक गोष्टीत अग्रेसर आहेत.

२ पुणे पोलीसांनी शहरी नक्षलवाद विरोधात कठोर कारवाई करण्यापासून ते जनतेस उत्तम सेवा देवून जनतेस अभिप्रेत असलेल्या अतिउत्तम सेवा देण्यापर्यंत सर्व निकषांमध्ये परिणामकारक काम केलेले आहे. त्यामध्ये प्रतिबंधात्मक कारवाईवर भर देवून गुन्हे नियंत्रण व जनतेमध्ये विश्वास वृधींगत करणे व त्यांना सोबत घेवून परिणामकारक कारवाई करणे हे दोन मुख्य आधारस्तंभ आहेत.

३ वरील उद्दीष्टे साकारण्यासाठी कोअर पोलीसींग सोबतच तंत्रज्ञानाचा परिणामकारक वापर करणे, यामध्ये आपण ५ दिवसांत पासपोर्ट व्हेरिफिकेशन करुन देण्यास सुरुवात केलेली आहे. सेवाप्रकल्पाद्वारे एकूण १६७७३ फोन कॉल्स अटेंड करुन त्यापैकी १६४७६ कॉल्सचे निराकरण करण्यात आले. त्याचबरोबर व्हीजीबल पोलीसींग, चौक्यांचे सक्षमीकरण, गुन्हेगारांवर सक्त निगराणी, हॉटस्पॉट ॲनालिसीस व त्यामध्ये इंटरव्हेन्शन, डाटा ॲनालिसीस व त्यातून आलेल्या माहितीवर नियंत्रण कक्षाद्वारे कारवाई, अँटी ड्रग कारवाई, सायबर पोलीस स्टेशन तसेच स्मार्ट सिटी अंतर्गत सीसीटीव्ही संनियंत्रण याबाबींचा समावेश होतो.

४ पोलीस यंत्रणेमध्ये मानवी संसाधन अत्यंत महत्वाचे आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे काम केलेले आहे –

- ❖ एम पोलीस - यामध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे सेवापट ऑनलाईन उपलब्ध केलेले आहेत. तसेच अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करुन कामात पारदर्शकता आणलेली आहे.
- ❖ कॉप्स एक्सलन्स द्वारे कौशल्य वाढविणे व व्यक्तीमत्व विकास वृधींगत करणे.
- ❖ आपल्या राज्यांमध्ये पोलीस खात्यामध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण आहे. महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना विशिष्ट आव्हाने असतात. ती आव्हाने ओळखून त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

५ अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी –

- ❖ अपघातप्रवण क्षेत्र ओळखून त्यावर कारवाई करणे.
- ❖ वाहतूक कोंडी सोडविण्यावर भर देणे.
- ❖ रॅश ड्रायव्हिंग कमी करण्यासाठी कारवाई करणे.
- ❖ रॉंगसाईड ड्रायव्हिंगचे विरुध्द कारवाई करणे.

याचा परिणाम म्हणून डिसेंबर २०१७ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत अपघातांचे प्रमाण कमी झालेले आहे.

६ जनतेची गरज ओळखून व त्यांचा विश्वास संपादन करुन काम करणे यासाठी –

- ❖ नवीन वर्षाच्या संकल्पासाठी ४५० बैठका घेवून ८५०० लोकांशी संपर्क साधला. तसेच सोशल मिडीयावरुन देखील सूचना मागविण्यात आल्या. यामध्ये एकूण ८११ सूचना प्राप्त झाल्या.
- ❖ २२ ट्रॅफिक क्लब सुरू केले आहेत. त्यामध्ये २२ व्हॉटसॲप ग्रुप केले असून त्यामध्ये २२०० सभासद आहेत.
- ❖ १८२ शाळांमध्ये आरएसपी असून ३७०७२ विद्यार्थी आरएसपीचे सभासद आहेत. तसेच नवीन स्कूल सेफ्टी प्रोग्राम सुरु करीत आहोत.
- ❖ स्वतंत्र सायबर पोलीस स्टेशन सुरु केलेले आहे. लोकांमध्ये सायबर अवेअरनेससाठी एकूण ५७ प्रोग्राम घेण्यात आलेले आहेत. त्यामध्ये सुमारे ४७००० लोकांनी सहभाग घेतलेला आहे.

७ पुणे पोलीसांनी विशेषत्वाने महिला, बालके व ज्येष्ठ नागरिक यांच्यावर विशेष लक्ष केंद्रीत केलेले आहे.

- ❖ १० पोलीस स्टेशनच्या हद्दीत बडीकॉप योजना कार्यान्वीत असून १८८ पो अधिकारी/कर्मचारी यामध्ये आहेत. ४२३१ ग्रुप यामध्ये असून ५५७ कंपन्या सहभागी आहेत. त्यामध्ये ७०४१० महिलांचा सक्रीय सहभाग आहे.
- ❖ ज्येष्ठ नागरिक कक्षाद्वारे सुमारे २५०० ज्येष्ठ नागरिकांनी संपर्क साधलेला आहे व त्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यात आलेले आहे. **या कक्षाला राष्ट्रीय स्तरावर मे २०१८ मध्ये फिक्की या संस्थेचा पुरस्कार मिळालेला आहे.**

❖ बालकांसाठी केलेल्या कामगिरीमध्ये मागील ३ वर्षात १९४३ बाल गुन्हेगार निष्पन्न झालेले आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी स्थानिक एनजीओंच्या मदतीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

❖ महिला सहाय्य कक्षाकडे २९३४ तक्रारी प्राप्त झाल्या असून पैकी १०३५ तक्ररीमध्ये समझोता करण्यात आलेला आहे.

या सर्व ३ कक्षांची व्याप्ती व कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांना एका छत्राखाली आणून **भरोसा सेल** सुरु करण्यात आलेला आहे. यामध्ये इतर खात्यांची देखील मदत मिळत आहे.

८ पायाभूत सुविधा - मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रत्येक पोलीसाचे स्वतःचे घर असावे याबाबीकडे विशेष लक्ष असून यासाठी खाजगी बँकाकडून कमी दराने गृहकर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे. त्याचा पुणे पोलीसांतील ९७५ कर्मचा-यांनी लाभ घेतलेला असून त्याचे प्रमाण १० टक्के इतके आहे.

पुणे पोलीस आयुक्तालय हे १९७६ साली स्थापन झालेले आहे. सध्या आयुक्तालयाच्या कामाची व्याप्ती वाढलेली असल्यामुळे नवीन क्राईम ब्रँच विंग तयार करण्यात येत आहे. यासाठी मा. पालक मंत्री यांचेकडून भरघोस सहकार्य मिळालेले असून यासाठीचा निधी मंजूर झालेला आहे व याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडून देखील सहकार्य मिळालेले आहे. यासाठी मा. पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांचे विशेष आभार.

पुणे जिल्हयातील सर्व अधिकारी टीम स्पीरीटने काम करीत आहेत. महसूल विभागाकडून येरवडा येथील शासकीय बंगला वाहतूक विभागासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच पुणे महानगरपालिकेकडून देखील चांगले सहकार्य मिळत आहे. स्मार्ट सिटी उपक्रमा मधून वाढीव सीसीटीव्ही व डिजीटल इनिशिएटीव्हसाठी भरपूर मदत मिळत आहे.

अशाच प्रकारचे सहकार्य सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच शासनाचे सर्व विभाग यांचेकडून भविष्यात देखील मिळावे ही अपेक्षा.

धन्यवाद.